-

## विशेष दिवाणी दावा क्र. २०/२०२२ मधील निशाणी क्र.८३ वरील आदेश

अर्ज वाचून पाहिला. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १९ रब्बानी या दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मयत झाले असल्याने त्यांचे संदर्भात यदाकदाचित झालेला अबेंटमेंटचा आदेश रददबातल करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीतर्फे अर्जात असे नमुद करण्यात आले की,प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १९ रब्बानी या दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मयत झालेले आहेत, परंतु वादीला प्रतिवादी क्र.१९ यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेला आहे व नजरचुकीने अर्ज देण्याचे राहुन गेल्याने प्रस्तुत अर्ज देण्यास विलंब झालेला आहे, सदरचा अबेंटचा आदेश रद्दबातल करण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ ते १३ यांचेतर्फे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविणेत आलेला आहे. तसेच प्रस्तावित वारसांना नोटीसा बजावणी झाले असताना देखील प्रस्तावित वारसांनी हजर होवून प्रस्तुत अर्जावर कसलेही म्हणणे दाखल केलेले नाही.

**०४.** वादीतर्फे विदवान विधिज्ञ ***श्री.एम.एम.पत्की*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे विदवान विधिज्ञ ***श्री.एस.जी.चिखलीकर*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत दावा हा वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता व ठरावाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता दाव्यास असलेले कारण हे मयत प्रतिवादी क्र.१९ चे कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द देखील अस्तित्वात राहते. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्यात योग्यप्रकारे, परिणामकारक निर्णय होण्याकरीता तसेच यदाकदाचित दाव्यात होणा–या हुकूमनाम्याच्या योग्य अंमलबजावणीकरीता मयत प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ अन्वये प्रतिवादी क्र. १९ रब्बानी यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द दाव्याचे कारण अस्तित्वात राहत असल्याची बाब विचारात घेता प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य

आहे. सबब नैसर्गिक न्यायदानाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज निशाणी क्र. ८३ मंजूर करण्यात येतो.

२) यदाकदाचित प्रतिवादी क्र. १९ रब्बानी यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला असेल तर तो रद्द समजणेत येतो.

"दावा येणेप्रमाणे पुढे चालेल."

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.09.29 13:14:14 +0530

(एम.बी.सोनटकके),
सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

दिनांक –२९/०९/२०२५